पान १ वरुन

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत तीन पक्ष ठरणार किंगमेकर!

५४३ आणि सर्व राज्यांच्या विधानसभांचे मिळून ४१२० सदस्य आहेत. त्यांची एकूण संख्या ४८९६ एवढी होते. आमदार आणि खासदारांच्या मतांचे मूल्य हे वेगवेगळे असते. राष्ट्रपती निवडणुकीसाठी मतदारांच्या मतांचे एकूण मूल्य हे १० लाख ८६ हजार ४३१ एवढे आहे. तसेच विजयासाठी अर्ध्याहून एक अधिक मताची आवश्यका असेल. त्यामुळे ५ लाख ४३ हजार २१६ मते मिळवणारा उमेदवार विजयी ठरेल.

राष्ट्रपती निवडणुकीसाठी सध्या भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएचे पारडे जड आहे. मात्र भाजपला इतर पक्षांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. सध्या भाजप आणि त्याच्या मित्रांकडे ४८ टक्के मते आहेत. एकूण १० लाख ८६ हजार मतांपैकी भाजपकडे ५ लाख २६ हजार मते आहेत. तर बहुमताचा आकडा ५ लाख ४३ हजार एवढा आहे. दरम्यान, सर्व विरोधी पक्षांकडे मिळून ५१ टक्के मते आहेत. त्यामुळे सर्व विरोधा पक्षांच्या मतांची गोळाबेरीज केली तर ती एनडीएपेक्षा २ ते ३ टक्के अधिक आहे. त्यामुळे विरोधी पक्षांकडून संयुक्त उमेदवार उभा करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यात टीआरएस, बीजेडी आणि वायएसआर काँग्रेसची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

२०१७मध्ये या तिन्ही पक्षांनी एनडीएच्या राष्ट्रपतीपदाच्या उमेदवारांना पाठिंबा दिला होता. मात्र यावेळी टीआरएस विरोधी पक्षांची आघाडी उभी करण्याच्या प्रयत्नात असल्याने ते भाजपच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याची शक्यता कमी आहे. तर बीजेडी आणि वायएसआर काँग्रेसने आपले पत्ते अजून खुले केलेले नाहीत.

राष्ट्रपतीपदाची निवडणूक जिंकण्यासाठी एनडीएला सुमारे १३ हजार मतांची गरज आहे. जर वायएसआर काँग्रेस आणि बीजेडीने पाठिंबा दिला तर एनडीएच्या उमेदवाराच्या विजयाचा मार्ग मोकळा होईल. काही दिवसांपूर्वी वाएसआर काँग्रेसचे प्रमुख जगनमोहन रेड्डी आणि ओदिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनाईक यांनी मोदींची भेट घेतली होती. मात्र त्यात नेमकी काय चर्चा झाली हे मात्र स्पष्ट होऊ शकलेले नाही.

नवीन पटनाईक, जगनमोहन रेड्डी आणि केसीआर यांनी सुरुवातीपासूनच काँग्रेसविरोधी भूमिका कायम ठेवली आहे. त्यामुळे ममता बॅनर्जी त्यांना आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यात केसीआर हे ममतांच्या बाजूने जाण्याची शक्यता दिसत आहे. मात्र बीजेडी आणि वायएसआर काँग्रेसने अद्याप भूमिका स्पष्ट केलेली नाही.

अयोध्यात महाराष्ट्र सदन बांधणारः ना. आदित्य ठाकरे

दर्शनासाठी आले आहेत. २०१८मध्ये आम्ही अयोध्येत आलो होतो. तेव्हा मुख्यमंत्री ना. उद्धव ठाकरेंनी आधी मंदिर नंतर सरकार, अशी घोषणा केली होती. त्यानंतर योगयोगाने मंदिराच्या बाजूने निकाल लागला आणि संपूर्ण प्रकिया झाली. आज आम्ही अयोध्येत आलो आहोत. ही आमची तीर्थयात्रा आहे. हा राजकीय दौरा नाही. येथे राजकारण नाही तर दर्शन घेण्यासाठी आलो आहोत.

पुढे ते म्हणाले की, निवडणुका आणि राजकारण यांचा काहीच संबंध नाही. शक्ती आणि भक्ती आमच्यासाठी एकच आहे. आमची भक्ती हीच आमची शक्ती आहे आणि हाच आमचा धर्म आहे. त्यामुळे आम्हाला शक्तीप्रदर्शनाची गरज नाही. शिवसेनेचे हिंदुत्व सगळ्यांना माहिती आहे. प्राण जाए पर वचन ना जाए. मुंबईत रामाच्या आशीर्वादाने रामराज्य येईल, असा विश्वासही या वेळी त्यांनी व्यक्त केला. तसेच शिवसेनेच्या अयोध्या दौऱ्यासाठी कोणाच्या अटी-शर्ती नाही. अयोध्येत आमचे साधूमहंतांकडून स्वागत करण्यात आले. अयोध्या ही आस्थेशी जोडलेली भूमी आहे. आम्ही सेवाभावाने येथे आलो आहोत. ७०च्या दशकात इस्कॉन मंदिराला बाळासाहेबांनी भेट दिली होती. त्यामुळे इस्कॉन ट्रस्टने मला बोलावल्याचे ना. आदित्य ठाकरेंनी सांगितले.

अयोध्येत महाराष्ट्र सदन उभारणार

अयोध्येत महाराष्ट्र सदन उभारण्यात येणार असल्याची माहिती आदित्य ठाकरे यांनी दिली. या जन्मभूमीत रामलल्लांच्या दर्शनासाठी देशभरातून लाखो भाविक येतात. यामध्ये महाराष्ट्रातील भाविकांची संख्या सर्वाधिक आहे. महाराष्ट्रातील भाविकांची अयोध्येत योग्य सोय व्हावी, यासाठी महाराष्ट्र सरकार प्रयत्नशील आहे. म्हणून महाराष्ट्र सदन अयोध्येत उभारण्यासाठी जागा द्यावी, ही मागणी मुख्यमंत्री ना. उद्धव ठाकरे हे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यानाथ यांना करणार आहेत. यासंदर्भात मुख्यमंत्री ना. उद्धव ठाकरे हे योगींशी पत्र व्यवहार करणार आहेत. १०० खोल्यांचे महाराष्ट्र सदन इथे आम्हाला बनवायचे आहे.

दोन वर्षांनी शाळांमध्ये चिमुकल्यांचा किलबिलाट

जिल्ह्यातील ५१ हजार ९६३ विद्यार्थ्यांना लाभ दिला जाणार आहे.

शाळेच्या पहिल्या दिवशी गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समितीमधील सर्व खात्याचे अधिकारी, समग्र शिक्षाकडील सर्व कर्मचारी, पर्यवेक्षीय अधिकारी यांचे शाळेच्या पहिल्याच दिवशी भेटीसाठी जिल्हाभरातील ठिकठिकाणच्या शाळांमधून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत मुलांचे स्वागत करण्यात आले.

चिपळूण नगर पालिकेची निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार

श्री. यादव यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची बुधवार दि. १५ जून रोजी शहरालगतच्या कापसाळ येथील शासकीय विश्रामगृहात बैठक पार पडली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना तालुकाध्यक्ष प्रशांत यादव म्हणाले, चिपळूण नगर पालिकेची निवडणूक आम्ही शक्यतो स्वबळावर लढणार आहोत. त्यादृष्टीने सर्व प्रभागात तयारी केली जात आहे. प्रत्येक प्रभागातील इच्छुक उमेदवारांची नावेही घेतली जात आहेत. सध्या सुमारे २५ इच्छुक उमेदवारांनी पक्षांकडे उमेदवारीची मागणी केली आहे. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ होऊ नये, यासाठी पारंपारिक मित्र असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस सोबत आघाडीसाठी चर्चा देखील केली जाईल. पालिकेत राष्ट्रवादीच्या तुलनेत काँग्रेसच्या नगरसेवकांची संख्या जास्त आहे. शिवसेनेनंतर काँग्रेसचे संख्याबळ अधिक आहे. त्यामुळे राष्ट्रवादीसोबत आघाडी करताना काँग्रेसला सन्मानजनक जागा मिळणे आवश्यक आहे. अपेक्षीत जागा मिळाल्या तरच आघाडी होऊ शकते. अन्यथा आमची आतापासून स्वबळावर वाटचाल सुरू आहे. पालिका निवडणुकीत काँग्रेस, शिवसेना व राष्ट्रवादी अशी महाविकास आघाडीची शक्यता कमी आहे. शिवसेनेकडून चांगल्या जागांचा प्रस्ताव आल्यास त्याचाही विचार केला जाईल. भाजपचा पर्याय मात्र स्विकारला जाणार नसल्याचे श्री. यादव यांनी यावेळी स्पष्ट केले. यापूर्वी पालिकेत राजकीय अपरिहार्यता म्हणून भाजप, काँग्रेस आणि राष्ट्रवादीची आघाडी झाली होती. आता मात्र भाजपसोबत आम्ही जाणार नाही. शहरात भाजपने दिवाळखोरीचा कारभार केलेला आहे. अनेक वाईट व नागरिकांच्या हिताविरोधी असलेल्या प्रस्तावांना आणि कामांना काँग्रेसच्या नगरसेवकांनी विरोधाची भूमिका घेतली होती. आमचे नगरसेवक स्वच्छ चारित्र्याचे आहेत. विद्यमान नगरसेवकांना पक्षाला पडत्या काळात चांगली मदत केली. त्यामुळे येत्या निवडणुकीत उमेदवारी वाटप प्रसंगी इच्छुक विद्यमान नगरसेवकांना संधी मिळेल. मात्र शहरातील अनेक प्रभागात पक्षाचे नवे चेहरे निवडणुकीच्या आखाड्यात असतील. नागरिकांशी ज्यांची नाळ जुळलेली आहे, त्यांनाच उमेदवारीसाठी पहिली पसंती दिली जाईल. येणाऱ्या पालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी देताना सर्व जाती-धर्मातील उमेदवारांना संधी दिली जाईल. ज्यांचे सामाजिक काम चांगले आहे, ज्यांच्यावर प्रभागातील जनतेचा विश्वास आणि ज्यांना काँग्रेस पक्षातून निवडणूक लढविण्याची इच्छा आहे, त्यांनी पक्षात यावे. पक्षातर्फे चाचपणी करून त्यांच्या उमेदवारीचाही जरूर विचार केला जाईल, असेही प्रशांत यादव यांनी स्पष्ट केले. या वेळी शहराध्यक्ष लियाकत शाह, सुधीर शिंदे, सुरेश राऊत, अन्वर जबले, राकेश दाते, गुलजार गुरवले, शकील तांबे, अशोक भुस्कुटे, करामत मिठागरी, शौकत काद्री, सफा गोठे आदी उपस्थित होते.

रत्नागिरीत रिक्षाची भाडे वाढ

झालेल्या बैठकीत उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी नवीन भाडेदर जाहीर केला आहे.

ऑटोरिक्षाचा प्रतिकिलोमीटर भाडेदर २० रुपये ४९ पैसे राहणार आहे. पहिल्या १.६ किमीसाठी ३१ रुपये भाडे आकारले जाणार आहे. त्यानंतर प्रत्येक टप्प्यासाठी प्रतिकिलोमीटरप्रमाणे भाडे आकारले जाईल. रात्री १० ते सकाळी ६ या कालावधीत ५० टक्के अतिरिक्त भाडे आकारले आणार आहे. सामानाकरिता ३ रुपये दर आकारण्यात येणार आहे. सुधारीत भाडेदर १४ जून रोजी मध्यरात्रीपासून लागू होणार आहेत.

ना. अनिल परब ईडी चौकशीला गैरहजर

दौरा असल्यामुळे ते चौकशीला उपस्थित राहू शकले नाही. ना. परब यांच्यावर साई रिसॉर्ट प्रकरणी मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साई रिसॉर्टचा मालकी हक्क आणि रिसॉर्ट बांधण्यामध्ये गैरव्यवहार केला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दापोलीतील स्थानिक ग्रामपंचायतींकडून ईडीने महत्त्वाची कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत. या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी ईडीने ना. अनिल परब यांना चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले होते.

मंत्री ना. अनिल परब शिर्डी दौऱ्यावर असल्यामुळे ईडीच्या चौकशीला गैरहजर राहिले. शिर्डीमध्ये त्यांनी साई बाबांचे दर्शन घेतले आहे. चौकशीला हजर राहणार नसल्यामुळे वकिलांनी चौकशीसाठी पुढील तारीख मागितली आहे.

पुण्यात खांद्यावर थाप, नंतर एकत्र हेलिकॉप्टर प्रवास

हे उपस्थित होते आणि त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री ना. अजित पवार व देवेंद्र फडणवीस हे एकाच फ्रेममध्ये दिसले. पंतप्रधानांचे स्वागत करताना ना. अजित पवार यांनी हात जोडले आणि मग पंतप्रधानांनी अजित पवार यांच्या खांद्यावर थाप मारीत त्यांच्याशी संवादही साधला. या वेळी देवेंद्र फडणवीसही तेथे उपस्थित होते. पंतप्रधानांनी ना. अजित पवार यांच्या खांद्यावर मारलेली ही थाप भविष्यातील राजकीय समीकरणाची नांदी नाही ना, अशी चर्चा राजकीय गोटात सुरु झाली आहे.

एकीकडे ना. अजित पवार यांना देहूमध्ये बोलण्यास न दिल्याने राजकारणात खळबळ उडाली असतानाच खुद्द ना. अजित पवार यांनीही त्या घटनेला महत्त्व न देता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हेलिकॉप्टरमधून देवेंद्र फडणवीस यांच्यासह मुंबई गाठली.आता हा हेलिकॉप्टरमधील एकत्रित प्रवास आणि खेळीमेळीचे वातावरण यावरून ना. अजित पवार यांची फडणवीस असोत किंवा पंतप्रधान मोदी, यांच्याशी किती जवळीक आहे हे सांगून जाते. साधारण तासभराच्या या प्रवासात काय चर्चा झाली याचा तपशील अधिकृतपणे समोर आला नसला तरी पहाटेचा शपथविधी ज्यांच्या लक्षात आहे, त्यांची धाकधूक यामुळे वाढली असून राजकीय गोटात अनेक तर्कवितर्क लढविण्यात येत आहेत.

घरगुती गॅस कनेक्शनच्या किंमतीत ७५० रुपयांची वाढ

यापूर्वी यासाठी २९०० रूपये खर्च करावे लागत होते.

रेग्युलेटरसाठी २५० रुपये

ग्राहकांना आता रेग्युलेटरसाठी १५० रूपयांऐवजी २५० रूपये मोजावे लागतील, तसेच इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम दिलेल्या निवेदनाद्वारे सांगण्यात आले आहे की, ५ किलोच्या सिलेंडरची सुरक्षा आता ८०० रूपयांऐवजी ११५० रूपये करण्यात आली आहे.नवीन गॅस कनेक्शनसाठी पुढीलप्रमाणे किंमत मोजावी लागणार आहे. गॅस सिलेंडरची किंमत रु. १०६५, सिलेंडर सुरक्षा रु. २२००, रेग्युलेटर रु. २५०, पासबुकसाठी रु. २५, पाईप रु. १५०.एका सिलिंडरसह नवीन गॅस कनेक्शन घ्यायचे असेल तर ३३९० रूपये मोजावे लागणार आहेत. इतकेच नव्हे तर तुम्हाला जर शेगडी घ्यायची असेल तर त्यासाठी वेगळे पैसे द्यावे लागणार आहेत.

राज्य सरकार रामभरोसे; फडणवीसांचा हल्लाबोल

पाणी योजनांची हत्या केली, असा आरोपही त्यांनी केला. धरण उशाला आणि कोरड घशाला अशी स्थिती जालन्यात आहे. पैठणच्या धरणात मोठ्या प्रमाणात पाणी असताना जालन्यात १५-१५ दिवस पाणी येत नाही. सरकारला जागे करण्यासाठी हा मोर्चा आम्ही काढल्याचा घणाघात फडणवीस यांनी केला.

काम बंद करणारे सरकार

फडणवीस म्हणाले, मविआ सरकारमुळे अनेक कामे रखडली आहेत. पाणी प्रश्नासाठी ठाकरे सरकार गंभीर नाही. आमच्या सरकारने १२९ कोटी रुपये पाणी योजनेसाठी पैसै दिले. मात्र अडीच वर्षांत ही योजना पुढे गेली नाही. हे सरकार केवळ चालू कामे बंद करण्याचे काम करते आहे. १५७ टीएमसी पाणी समुद्रात जाऊ न देता ते गोदावरी खोऱ्यात आणण्याचा प्रयत्न मविआ सरकारने हाणून पाडला. जलयुक्त शिवार योजना ठाकरे सरकारने बंद केली. हे सरकार सगळ्या योजना बंद करते आहे. वैधानिक विकास महामंडळ बंद केले आणि मराठवाड्यावर अन्याय केला. मात्र मंत्र्यांनी ब्र शब्द काढला नाही. मराठवाड्यातील मंत्रीही केवळ पैसा कमविण्यात व्यस्त आहेत, असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला.

सरकारला झोपू देणार नाही

फडणवीस म्हणाले, जनतेच्या प्रश्नाचे ठाकरे सरकारला काही देणे घेणे नाही. त्यांना गरिबांच्या समस्या सोडविण्यासाठी सिंहासन दिले आहे. मात्र, त्यांच्याकडून जनतेसाठी काही काम झाले नाही. ३५ हजार कोटी मोदी सरकारने पाणी समस्या सोडविण्यासाठी दिले. मात्र, राज्य सरकारकडून ५०० कोटी रुपये देखील खर्च होऊ शकले नाहीत. जालन्याला रोज पाणी मिळणार नाही, तोपर्यंत ठाकरे सरकारला आम्ही झोपू देणार नाही. सरकारमुळे मराठवाड्यातील जनतेच्या पाणी योजना रखडल्याचा आरोपही त्यांनी केला.

खा. शरद पवारांनीच राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढवावी

देशाने ७५ वर्षांत जपलेली मूल्ये पायदळी तुडवली आहेत. संविधानिक यंत्रणांचा गैरवापर चालविला आहे. अशावेळी सर्व विरोधीपक्षांनी एकत्र येऊन राष्ट्रपतीपदासाठी एकमुखाने उमेदवार ठरवावा व निवडून आणावा. भाजप विरोधातील पक्षांना एकत्र आणण्याची सुरुवात महाराष्ट्राने केली. शिवसेनापक्ष प्रमुख ना. उद्धव ठाकरे व खा. शरद पवार यांनी ही सुरुवात केली. केवळ राष्ट्रपती निवडीसाठी नव्हे तर सर्व विरोधी पक्षांनी एकजूट मजबूत केली पाहीजे. खा. शरद पवार यांनी ही निवडणूक लढवावी, असा शिवसेनेचा आग्रह आहे. त्यांचा नकार कायम राहिल्यास सर्वसामान्य, उज्ज्वल प्रतिमेचा शक्य झाल्यास राजकीय परिघाबाहेरचा उमेदवार निवडावा, हे देशासाठी प्रतिष्ठेचे पद आहे म्हणून ही निवडणूक महत्वाची असल्याची भूमिका शिवसेना नेते तसेच राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी स्पष्ट केली.

विरोधकांचे संयुक्त निवेदन

या वेळी सर्व विरोधी पक्षाच्यावतीने संयुक्त निवेदन सादर करण्यात आले. केंद्रातील मोदी सरकार सत्तेत आल्यापासून मागील आठ वर्षांपासून लोकशाही मूल्ये पायदळी तुडवत आहे. नागरिकांना दिलेली आश्वासने हवेत विरली आहेत. राज्यघटनेची चौकट मोडण्याची वारंवार प्रयत्न होत आहे. आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वात वाईट सरकार असल्याची भावना या वेळी विरोध गटांतील नेत्यांनी व्यक्त केली. सर्वसामान्य जनतेला महागाईच्या खाईत लोटले. शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष, तरुणांच्या हाताला रोजगार देण्यात हे सरकार अपयशी ठरले. केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील दरी वाढत चालली आहे, असे यापूर्वी कधीही घडले नाही. राज्य सरकारला अडचणीत आणण्यासाठी राज्यपाल कार्यालयांचा वापर केला जात आहे. याला विरोध दर्शविण्यासाठी सर्व विरोधी राज्यातील मुख्यमंत्र्यांची ऑगस्ट महिन्यात परिषद घेण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

एनडीएकडे आघाडी

आकड्याचं गणित पाहाता सत्ताधारी एनडीएकडे आघाडी आहे. त्यात जर बीजद, ऑल इंडिया अन्ना द्रविड मुनेत्र कषगम (अन्नाद्रमुक) आणि युवजन श्रमिक रायथू काँग्रेस पार्टी (वाईएसआरसीपी) यासारख्या पक्षाचं समर्थन मिळाल तर एनडीएच्या उमेदरावाचा विजय निश्चित मानला जातोय. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सत्ताधारी एनडीए राष्ट्रपदी पदासाठी उमेदवाराची चाचपणी करत आहेत.

राष्ट्रपतीपदासाठी १८ जुलै रोजी मतदान

पुढील महिन्यात १८ जुलै रोजी राष्ट्रपतीपदासाठी मतदान पार पडणार आहे. विद्यमान राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा कार्यकाळ २४ जुलै रोजी संपत आहे. त्यामुळे आता राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक होणार आहे. निवडणूक आयोगाने राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची अधिसूचना जाहीर केली आहे.

आता रोगनिदान होणार अधिक सहज आणि सुस्पष्ट

रुबीमध्ये १.५ टेस्ला एमआरआय सुविधा

चिपळूण : सर्व क्षेत्रात तंत्रज्ञानाने कमाल प्रगती केलेली आहे. संगणक प्रणाली बरोबरच अनेक क्षेत्रे डिजिटल झाली आहेत, होत आहेत. वैद्यकीय क्षेत्रात झपाट्याने होत असलेली तंत्रज्ञानाची प्रगती निश्चितच भूषणावह आहे. प्रगत तंत्रज्ञान आणि नाविन्याचा दृष्टीकोन सतत बाळगून असणारे रुबी हॉल आता १.५ टेस्ला या आधुनिक एमआरआय प्रणालीचा चिपळूण येथे शुभारंभ होत आहे, त्यानिमित्ताने...

सातत्याने गेली पाच दशके रुबी हॉल क्लिनिक रुग्णांना प्रगत तंत्रज्ञानाने युक्त उच्चतम सेवा देत आहे. प्रारंभी सातारा येथे पॉईंट २ क्षमतेचे एमआरआय सुरु करण्यात आले.. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन रुग्णांना चांगली सुविधा कशी देता येईल अशा प्रयत्नातून पॉईंट २ पेक्षाही जास्त क्षमतेची कोणती मशीन सुरु करता येईल याबाबतचा विचार होऊ लागला. उच्चतम सेवा व प्रगत तंत्रज्ञान यांचा संगम साधून ग्राहक विशेषतः रुग्णांचे हित जपता येईल याचा प्रामुख्याने विचार करुन चिपळूणमध्ये प्रथम १.५ टेस्ला मशिन सुरु करण्याचा वाचार झाला. सदर मशीनची गुणवत्ता अधिक पटींनी जास्त आहे. रास्त दर, उच्चतम सेवा व गुणात्मक निदान इ. कारणांमुळे एमआरआयचा विश्वासार्हतेचा आलेख सतत उंचावतच राहिला. निरंतर वैज्ञानिक शोध व वैद्यकीय चाचण्या करणाऱ्या यंत्रणेत नव्याने झालेले बदल, डॉक्टरांना तसेच रुग्णांना उत्कृष्ट सेवा देऊ शकतात हे सिद्ध झाले.

१.५ टेस्ला ही एक अतिशय कार्यक्षम एमआरआय प्रणाली असून ती अधिक क्षमतेची आहे. यामुळे रुग्णांच्या मेंदूच्या, मणक्याच्या तसेच शरीराच्या इतर कोणत्याही अवयवांच्या प्रतिमा या अधिक सुस्पष्ट व पॉईंट २, ३ यांच्या निदानापेक्षा अधिक पटीने सकारात्मक परिणाम देणाऱ्या आहेत. त्यामुळे रुग्णांवर अधिक चांगले उपचार करणे सहज शक्य होणार आहे. १.५ टेस्ला या प्रणालीद्वारे एमआयआर स्कॅन, स्तन स्कॅन, सीटी स्कॅन, प्रोस्टेट, मायलोग्राम अशा विविध व्याधींवर वेगवेगळे प्रोटोकॉल्स उपलब्ध असल्यामुळे लवकरच सर्व चाचण्या पूर्ण होऊन १.५ टेस्ला साताराकरांच्या सेवेत रुजू होईल. सदर १.५ टेस्ला सेवेचा रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रुबी हॉल व्यवस्थापनाने केले आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, तुकडी मुंढर, पोटतुकडी, ता. गुहागर, जि. रत्नागिरी हद्दीतील तसेच मे. सब रजिस्टार गुहागर यांचे कार्यक्षेत्रातील तसेच व पंचायत समिती गुहागर यांचे हद्दीतील गाव मौजे मुंढर, ता. गुहागर येथील खालील वर्णनांची मिळकत ---

भूमापन क्रमांक	क्षेत्र (हे. आर.)	आकर (रू.पै.)	पैकी बक्षीस दिलेले क्षेत्र
१६३९/१	५-६४-०० +पोटखराबा ०-०२-०० ५-६६-००	४-८६	१-२०-०० हे. आर.

उपरोक्त वर्णन केलेल्या संपूर्ण मिळकतीपैकी **१-२०-०० हे. आर. क्षेत्र हे श्री. राकेश राजाराम महाडीक यांचे प्रत्यक्ष मालकी कब्जा वहिवाटीचे आहे.** सदरहू श्री. राकेश राजाराम महाडीक हे त्यांचे हिश्याचे १-२०-०० हैं. आर. क्षेत्र आमचे अशील श्री. भालचंद्र जयराम शिर्के यांना कायदेशीर रजिस्टर्ड बक्षीसपत्राने बक्षीस देत आहेत. सदरहू बक्षीसपत्राने घेत असेलेले संपूर्ण क्षेत्र हे निर्बंध व बोजाविरहित असून ते कायदेशीर रजिस्टर्ड बक्षीसपत्राने देण्याचा / हस्तांतरीत करण्याचा पूर्ण कायदेशीर हक्क आणि अधिकार सदर जमिन मालक यांना आहे अशी हमी / खात्री त्यांनी आमचे अशील यांना दिली आहे. तसा करारनामाही आमचे अशील यांचे समवेत त्यांनी साक्षिदारांसमक्ष साक्षांकित करून लिहून दिलेला आहे. मात्र अद्याप रजिस्टर्ड बक्षीसपत्र केलेले नसल्यामुळे सदरहू मिळकत आमचे अशील यांचे व्यतिरीक्त अन्य कोणाही व्यक्तीस कोणत्याही स्वरूपात हस्तांतरीत करू नये, मालकी हक्कामध्ये बदल करू नये (third party interest create) करू नये याकरीता बक्षीपत्राच्या व्यवहाराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द करत आहोत.

तरी कोणाही व्यक्तीची/असामींची सदर मिळकतीत वारसा, गहाण, खरेदी, विक्री, साठेकरार, भाडेकरार, देणगी, लीज, बक्षीस, कुळ, चार्ज, लायसन्स करार, पोटगी, ट्रस्ट, इजमेंट अगर अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क, हितसंबंध असल्यास अगर सदर बक्षीसपत्र व्यवहारास कोणाही असामींची हरकत असल्यास त्यांनी ०७ (सात) दिवसांचे आत आपले हक्काबाबतचे कागदपत्रांसह खाली दिलेल्या पत्यावर प्रत्यक्ष भेटून अगर लेखी कळवावे. तसे न केल्यास सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही स्वरूपाचा हक्कसंबंध नाही अगर असल्यास तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे कायदेशीर बक्षीसपत्र व्यवहार पूर्ण करतील. तसेच आमचे अशीलां व्यतिरीक्त उपरोक्त मिळकती संदर्भात अन्य कोणीही असामींनी श्री. राकेश राजाराम महाडीक यांचेशी कोणताही व्यवहार करु नये. याउपरही केला तो आमचे अशील यांचेवर बंधनकारक राहणार नाही. नाईलाजास्तव आमचे अशील यांना कायदेशीर कारवाई करणे क्रमप्राप्त होईल याची समज घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे

दिनांक : १४.०६.२०२२

सही/-
मनाली एम.आरेकर
ॲडव्होकेट
हायकोर्ट मुंबई चित्रबन शिवाजी चौक
ता.गुहागर, जि.रत्नागिरी
. मो. ९४२३२९५३२८

फॉर्म ए

जाहीर उद्घोषणा

(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ च्या नियम ७२ (१) (ब) (एक) अन्वये नियम ७२ (१) (ब) (दोन) पहा)

पारनेर तेली पोपटवाडी (रांजणी) सायबोर सिंचिकेला कर्जदारांची तसेच बेपत्ताकडील

जंगमिक मालमत्ता

अ.क्र.		
१.	[illegible]	[illegible]
२.	[illegible]	[illegible]
३.	[illegible]	[illegible]
४.	[illegible]	[illegible]
५.	[illegible]	[illegible]
६.	[illegible]	[illegible]
७.	[illegible]	[illegible]
८.	[illegible]	[illegible]
९.	[illegible]	[illegible]
१०.	[illegible]	[illegible]
११.	[illegible]	[illegible]
१२.	[illegible]	[illegible]
१३.	[illegible]	[illegible]
१४.	[illegible]	[illegible]
१५.	[illegible]	[illegible]

पासपोर्ट हरवला आहे

सलमान इक्बाल सुर्वे पेठमाप, ता.चिपळूण, जि. रत्नागिरी P.No.J1665614 बाजारपेठ ते पेठमाप येथे प्रवास करत असताना माझा पासपोर्ट हरवला आहे. कोणाला सापडल्यास ९२२२६६१११३ या नंबरवर संपर्क साधावा.

सही/-
(सलमान इक्बाल सुर्वे)

CHANGE IN NAME

I WAS KNOWN AS SHILPA PANDURANG BHIDE. I HAVE CHANGED MY NAME HENCE FORTH I WILL BE KNOWN AS SHEETAL SANJAY MUNGALE.

ADDRESS- KESHAV SHRUSTI AT-PO. DEVRUKH , TAL. SANGMESHWAR, DIST-RATNAGIRI. PIN-415804

sd/-
By old NAME

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते ते खालील प्रमाणे: आमचे पक्षकार प्रस्तुतची नोटीस ज्या मिळकती संदर्भात देत आहेत त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

जिल्हा तुकडी रत्नागिरी पोट तुकडी तालुका- गुहागर पैकी असगोली गावातील, तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब गुहागर यांचे कार्यक्षेत्रातील खालील वर्णनाची मिळकत.

भुमापन क्रमांक व उपविभाग क्र	क्षेत्र हे आर-चौ.मी	आकार रु.पै.	स्थानिक नाव
७१४	२-०२-०० ख. ०-६१-०० २-६३-००	०.८२	बंगल्या नजीक

या प्रमाणे मिळकतीचे वर्णन आहे.

आमचे पक्षकार यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मिलिंद मधुकर दिक्षीत यांचेकडून सदरच्या मिळकतीचे संपुर्ण क्षेत्र खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत श्री. मिलिंद मधुकर दिक्षीत यांचे मालकीची असुन त्यांचेव्यतिरिक्त सदर जमिन मिळकतीत अन्य कोणत्याही व्यक्तिंचा मालकी हक्क, वहिवाट, इजमेंटस, साठेकरार, अगर अन्य प्रकारे हक्क हितसंबंध नसल्याचीही ग्वाही सदर जमिन मालकांनी आमचे पक्षकारांना दिलेली आहे. तरी सदर मिळकतीमध्ये अन्य कोणत्याही व्यक्तिंचे वारसा, मालकीहक्क, खरेदी, बक्षिस, गहाण, लिज, साठेकरार, विरुध्द कब्जा, संपादन इजमेंटसचे हक्क अगर दिवाणी अगर टेनन्सी अगर अन्य कोणतेही कोर्टामध्ये वाद चालू असल्यास अथवा सदर व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तिंनी त्यांच्या हरकती त्यांचे हक्क हितसंबंधाबाबतचे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी स्वरुपात खाली सही करणार यांचेकडे सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून १० दिवसाचे आत नोंदवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदर मिळकत आमचे पक्षकारांना विकत घेण्याचा पूर्ण हक्क अधिकार आहे व इतरांनी त्यांचे सदर जमिनीत काही हक्क हितसंबंध असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरुन आमचे पक्षकार सदर मिळकतीबाबतचे खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणाऱ्या तक्रारींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : १६.०६.२०२२
चिपळूण

सही/-
ॲड. नितीन शरद केळकर
रजि.नं. ११७७
नोटरी आणि ॲडव्होकेट
कृष्णेश्वर नगर, ऑफिस नं. ७
मुंबई-गोवा हायवे, पाग चिपळूण

जाहीर नोटीस

दापोली येथील मे.ज्युडी मॅजि. वर्ग-१ सो.यांच कोर्टात

फौ.कि.अर्ज.नं.८४/२०२२

जमीर अब्दुल गफूर काझी
रा.दापोली, काळकाई कोंड,
ता.दापोली, जि.रत्नागिरी. -अर्जदार

विरुध्द

१.दापोली नगरपंचायत, दापोली
मु.पो.ता.दापोली, जि.रत्नागिरी.
२.मे. तहसीलदार साहेब दापोली,
ता.दापोला ।जि. रत्नागिरी. -सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार यांची बहिण कै. शबनम अब्दुल गफूर काझी हिचा मृत्यू दिनांक २५/०६/२००३ रोजी काळकाई कोंड येथील रहात्या घरी झाला मृत्यूची नोंद करण्याबाबत सा.वाला यांना आदेश देणेत यावा यासाठी अर्जदार यांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व लोकांस कळविणेत येते की, अर्जदार यांचे उपरोक्त मागणीस कोणाची हरकत अगर आक्षेप असल्यास त्यांनी या मे. कोर्